पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/689/2020
पुणे 1 दिनांक :-27/11/2020

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**नवअधिरा एज्युकेशनल फौडेशन माळवाडी पुनवळे ता मुळशी जि पुणे संचालित अधिरा इंटरनॅशनल स्कूल सर्व्हे क्र 37/1/1 व सर्व्हे क्र 38/5/1 पुनवळे ता मुळशी जि पुणे**

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय क्रमांक जा.क्र. एसएसएफ-1019/प्र.क्र.1220 /एसएम-2 ,दिनांक-20/9/2019
3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.शिउंस/प्राथ-202/ स्वयंअशाळा / मान्यता पुवि /2019-20/8872 दिनांक 13/12/2019

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तींवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ. 1 ली ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | **नवअधिरा एज्युकेशनल फौडेशन माळवाडी पुनवळे ता मुळशी जि पुणे** | **अधिरा इंटरनॅशनल स्कूल सर्व्हे क्र 37/1/1 व सर्व्हे क्र 38/5/1 पुनवळे ता मुळशी जि पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इ.1 ली ते इ. 8 वी) | २०१८-१९ |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन 2018-19 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएसएफ/प्र.क्र.735/एसएम-2, दिनांक-6.8.2018 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

शिक्षण विभाग माध्यमिक
यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)
पुणे जिल्हा परिषद, पुणे
सोमवार पेठ, पुणे - 11

मेल आयडी - rmsapunezp@gmail.com                                        दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०६१७३३

जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/कार्या.क्र.१२/९५३३८८७/२०२५                                        दि. १० /११/२०२५

परवानगी वर्ष-२०१८-१९
परवानगी प्रकार- नविन शाळा
शाळा सुरु वर्ष-२०२०-२१

## स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा
## प्रथम मान्यता

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव.- नवअधिरा एज्युकेशनल फाउंडेशन,माळवाडी,पुनेवळे ता.मुळशी, जि.पुणे

२. मुख्याध्यापक- अधिरा इंटरनॅशनल स्कुल,माळवाडी,पुनेवळे ता.मुळशी जि.पुणे

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.**
**(इयत्ता-९ वी प्रथम मान्यता)**

**संदर्भ :-** १. माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-१२.
२. शासन निर्णय शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१९/प्र.क्र.१२२०/एस.एम-२ दि.२०/०९/२०१९
३. मुख्याध्यापक, अधिरा इंटरनॅशनल स्कुल,माळवाडी,पुनेवळे ता.मुळशी जि.पुणे जा.क्र.५९/२०२५-२६ दिनांक ०८/०८/२०२५
४. शिक्षणाधिकारी(मा.)जि.प.पुणे यांचे कडील दिनांक १७/१०/२०२५ रोजीचा तपासणी अहवाल
५. या कार्यालयाकडील मान्य टिपणी दिनांक. /११/२०२५.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा नविन शाळा/दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.३ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. संदर्भ क्रमांक ४ अन्वये शिक्षणाधिकारी(मा.)जि.प.पुणे यांनी केलेल्या शिफारसीनुसार संदर्भ क्रमांक ५ च्या मान्य टिपणीनुसार आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | प्रथम मान्यता वर्ग | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र.एसएफएस-१०१९/प्र.क्र.१२२०/ एस.एम-२ दि.२०/०९/२०१९<br>यादीतील क्रमांक – अ.क्र.१ | नवअधिरा एज्युकेशनल फाउंडेशन,माळवाडी,पुनावळे ता.मुळशी, जि.पुणे | अधिरा इंटरनॅशनल स्कुल,माळवाडी, पुनावळे ता.मुळशी जि.पुणे<br>UDISE २७२५२००२५०५ | इंग्रजी | नविन शाळा सी.बी.एस.ई | इ ९ वी | २०२५-२६ | |

## अटी व शर्ती-

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.
४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.



Scanned with OKEN Scanner

५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.

७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

८. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.

९. वर्गांमध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११. शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.

१३. शासनाचे वतीने एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४. याद्वारे ज्या वर्गांना स्वयंअर्थसहायित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.

१६. शाळा बंद करणे- शासनास किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्त्वावर स्थापन केलेली शाळा बंद करता येणार नाही.

१७. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.

१८. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

a. शाळेमध्ये पुरेशी व सुयोग्य अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. (Fire Audit)
b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत
c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
d. शाळेची इमारत, सर्व दृष्टी कोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.
e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)
f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९. संदर्भ क्र.२- शासन निर्णय दि.१४/०७/२०१७ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१२/०२/२०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, माध्यमिक शाळा सहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षांकरिता लागू असेल. त्यानंतर कायम मान्यता घेण्यात यावी. शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल.

२१. पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने, या आदेशातील व इतर कायद्याने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

Digitally signed by
Bhausaheb Shivaji Karekar
Date: 10-11-2025
19:56:18

**(डॉ भाऊसाहेब कारेकर)**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**प्रत, माहितीस्तव,**

**१. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१.**
**२. मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५.**

Scanned with OKEN Scanner